महाराष्ट्र शासन
जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय नंदूरबार
टोकरतलाव रोड, रुम नं-७, प्रशासकिय इमारत, नंदूरबार-४२५४१२
E-Mail : ddcnandurbar@gmail.com
Telephone No.- 02564-210016

---

जा.क्र. जिउपवदुव्यनं/तां/जिकृरेकें/द्रवनत्र /निविदा/प्रसिध्दी/३०४५/२०२५, नंदूरबार दि. १०/११/२०२५

**प्रति,**

**जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी,**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नंदुरबार**

**विषय:-** जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र नंदुरबार येथील सन ०१/१२/२०२५ ते ३०/१२/२०२६ या वर्षाकरीता जिल्हयातील पशुवैद्यकिय दवाखान्यांना द्रवनत्र वाहतुक पुरवठा करण्यासाठी जिल्हयाच्या https://nandurbar.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्दीस देणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये विनंतीपूर्वक सादर करण्यात येते की, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र नंदुरबार येथील सन ०१/१२/२०२५ ते ३०/१२/२०२६ या कालावधी करीता जिल्हयातील पशुवैद्यकिय दवाखान्यांना द्रवनत्र वाहतुक करून पुरवठा करण्यासाठी जिल्हयाच्या https://nandurbar.nic.in. या संकेत स्थळावर दि. १३/११/२०२५ ते २०/११/२०२५ पर्यंत प्रसिध्दीस करण्यात यावी, ही विनंती.

**सोबत :-** प्रसिध्दी करावयाचा द्रवनत्र व रेतमात्रा वाहतूकीसाठी निविदेच्या नियम व अटींचे पत्र.

(डॉ.तु.गो.गिते)
**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यसाय**
**नंदूरबार**

**प्रत माहीतीसाठी सविनय सादर**

**१) मा आयुक्त पशुसंवर्धन, औंध पुणे-६७**
२/- आपणांस विनंती करण्यात येते की, वाहतूकीची निविदा सुचना पशुसंवर्धन खात्याच्या https://ah.adfmaharashtra.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

**२) मा प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, नाशिक विभाग नाशिक-२**

# जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय नंदूरबार कार्यालय,अंतर्गत.

# जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,नंदुरबार

## दि. ०१/१२/२०२५ ते ३०/११/२०२६ या

## कालावधीसाठी

---

# द्रवनत्र,द्रवनत्रपात्रे इ.साहित्य वाहतूकीची व्दितीय निविदा

---

जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय नंदूरबार

यांचे कार्यालय

नंदुरबार, जिल्हा द्रवनत्र व रेतमात्रा वाहतूक निविदा २०२५-२६

निविदा-प्रपत्र

जा.क्र. जिउआपदुनं/जिकृरे/ /२०२५ नंदुरबार दि. / /२०२५

नंदुरबार जिल्हात द्रवनत्र व रेतमात्रा वाहतूक करुन पुरवठा करणेसाठी निविदा सन २०२५-२६ द्रवनत्र व रेतमात्रांच्या वाहतूकीसाठी निविदेच्या नियम व अटीः-

निविदा दरपत्रके दोन लिफाफा पद्धतीने सादर करणे बंधनकारक आहे.

(अ) पहिला लिफाफा:-

१. बयाना रक्कम रुपये ५०००/-
२. पुर्वानुभवाचा तपशिल
३. या प्रकारच्या निवीदेत भाग घेतला असल्यास तपशिल
४. आयकर भरल्याचे प्रमाणपत्र भरला असल्यास अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य
५. वाहनांची कागदपत्रे, आरसी बुक विमा फिटनेस प्रमाणपत्र व वाहतूक परवाना
६. शर्ती व अटी मान्य असल्याचे सहीचे पत्र

(अ) पहिला लिफाफा:-

१. निविदा दरपत्रक (दरपत्रक)

<u>द्रवनत्र वाहतुकीबाबत अटी व शर्ती</u>

१. संपुर्ण निविदा प्रक्रिया हि बंद पाकीट पध्दतीने राहील.

२. निविदा कालावधी- दि. ०१/१२/२०२५ ते ३०/११/२०२६ किंवा पुढील निविदा सन २०२६-२७ ची मंजुर होईपर्यंत राहील.

३. निविदेच्या अटी व शर्ती तसेच निविदेसंबंधी इतर कोणतीही माहिती हि जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

४. निविदा फॉर्म वाटप कालावधी दि. १३/११/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासुन दि.२०/११/२०२५ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत राहील. (शासकिय सुटीचे दिवस वगळून)

निविदा फॉर्मचे शुल्क रु.७५०/- (अक्षरी रुपये सातशे पन्नास मात्र ) व **निविदा भरताना बयाणा रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) चा धनाकर्ष (डी.डी.) / बँकर चेक जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,नंदुरबार यांचे नावाचा 'युनियन बँक ऑफ इंडिया, जिल्हाधिकारी कार्यालय,नंदुरबार'शाखेचा जमा करण्यात यावा.**

५. निविदाधारकाची निविदा मंजुर झाल्यास, परंतु अन्य कारणांनी त्यांची निविदा नाकारल्यास त्याची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६. निविदा भरणेचा अंतिम दिनांक, वेळ- दि. २५/११/२०२५ रोजी दुपारी ०६.०० वाजेपर्यंत

७. निविदा उघडणेचा दिनांक, वेळ-दि. २८/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता.

निविदाधारकांनी माहिती भरतांना दुर्लक्ष केल्यास किंवा पुर्ण माहिती न भरल्यास सदरची निविदा रद्द होईल याची गाभीर्याने नोंद घ्यावी.

८. निविदा बंद पाकीट पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे.

९. **नं.१-तांत्रिक लिफाफयातील सहप्रपत्रे-**

१. निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वाक्षरी करुन सदर प्रपत्र भरावेत.

२. निविदा फॉर्मचे शुल्क रु.७५०/- (अक्षरी रुपये सातशे पन्नास मात्र ) व निविदा भरताना बयाणा रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) चा धनाकर्ष (डी.डी.)/ बँकर चेक जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांचे नावाचा युनियन बँक ऑफ इंडिया, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार शाखेचा जमा करण्यात यावा.

३. वाहनासंबंधिची कागदपत्रे- वाहनाचे रजिस्ट्रेशन बुक व टॅक्स बुक, माल वाहतुकीचा परवाना, वाहनाचा विमा, पियुसी,पासिंग वर्ष व मुदतीबाबतचा तपशील.रहिवासी दाखला,समंतीपत्र,वाहनचालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स,आधार कार्ड,पॅन कार्ड इ. वरिल सर्व कागदपत्रे तांत्रिक लिफाफयामध्ये अपलोड केले जातील.

**नं.२- व्यापारी प्रपत्र-**

**दरपत्रक- वाहनाचा प्रति कि.मी. दर अक्षरी व अंकी नमूद करावा. सदर दर सर्व करांसह दरपत्रकामध्येच नमुद करण्यात यावा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, नंदुरबार यांच्याकडे दरपत्रक मंजुर अथवा नामजुंर करण्याचा अधिकार राहील.**

१०. **निविदा धारकांनी निविदा रजिस्टर पोस्ट/स्पिड पोस्ट/कुरीयर द्वारे पाठविल्यास निविदा स्विकारल्या जाणार नाहीत अथवा त्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत.**

११. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार पासून नंदुरबार जिल्हयातील पशुवैद्यकीय दवाखान्यांना रेतमात्रा व द्रवनत्राची (५० ते ५५ लिटर क्षमतेची अंदाजे ६० किलो वजनाची ३५ द्रवनत्रपात्रे) वाहतूक करणेसाठी योग्य वाहतूक क्षमता असलेले परिवहन विभागाकडील विहीत नोंदणी असलेले मालवाहु वाहन असणे आवश्यक आहे. जिल्हयातील १०४ संस्थांना द्रवनत्र व रेतमात्रा पुरविण्यासाठी ४ रुटद्वारे दरमहा सर्वसाधारणपणे ९०० कि.मी. याप्रमाणे वर्षात अंदाजे **११००० कि.मी.** वाहतूक करावी लागते. (सोबत केंद्रनिहाय ४ रुटचा तक्ता दिला आहे.) या व्यतिरिक्त द्रवनत्र खरेदीच्या होणा-या भावबंध करारानुसार द्रवनत्र आणणेसाठी नाशिक अथवा महाराष्ट्राबाहेरील ठिकाणी दरमहा साधारणतः दोन ते तीन वेळा जावे लागू शकते. मुक्कामासाठी वेगळा आकार दिला जाणार नाही. **वाहनचालकाशिवाय वाहनासोबत एक मदतनीस ठेवणे व त्याने साधारणतः ६० किलो वजनाच्या द्रवनत्रपात्रांची वाहनातून चढउतार करणे व वाहनापासून केंद्राच्या ठिकाणी पात्रांची ने-आण करणेचे काम करणे आवश्यक आहे. मदतनीसासाठी वेगळा आकार दिला जाणार नाही. तसेच इंधनाची**

**दरवाढ झाली तरी दरात वाढ मिळणार नाही.**

१२. वाहातुकीचे वाहनामध्ये कॉयरमॅटीग अथवा नरम आच्छादनाचा वापर करणे आवश्यक आहे.

१३. द्रवनत्र पात्राचे नुकसान व तुटफूट होणार नाही तसेच वाहन हुड असलेले असावे, ज्यामुळे उन,वारा,पाऊस यापासून द्रवनत्रपात्रांना संरक्षण मिळेल.

१४. द्रवनत्र वायू हा अतिथंड अवस्थेत (-१९६ डिग्री सेल्शीअस/-३२० फॅरनहीट) असतो. त्यामूळे वातावरणाशी संबंध येताना त्यातून जी वाफ निघते ती अति थंड असते याची माहिती ठेकेदाराने पुर्णपणे करुन घ्यावी.द्रवनत्र वायू एका पात्रातून दुस-या पात्रात टाकताना सावधपणे टाकावा तो निष्काळजीने वाया गेल्याचे आढळून आल्यास त्याची भरपाई ठेकेदाराने करुन द्यावी लागेल.

१५. वाहतुक कंत्राटदाराने ज्या गाडीने वाहतुक करणार आहे ते वाहन त्याच्या मालकीचे असावे.

१६. वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत ठेकेदारास सर्वसाधारणतः २४ तासापूर्वी सुचना देण्यात येईल.

१७. प्रत्येक वहातुकीच्या वेळी द्रवनत्रपात्रे वाहन चालकाच्या ताब्यात देण्यात येतील म्हणून त्याची जबाबदारी वाहनाचे मालकावर निश्चित राहील .वाहतुकीचे वेळी मालकाने किंवा त्याचे व्यक्तीनेही पात्रे हाताळताना निष्काळजीपणा झाल्यास व द्रवनत्रपात्राची तुटफूट होऊन नुकसान झाल्यास, त्याची किंमत ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.

१८. द्रवनत्राची वाहतुक करताना त्या गाडीमध्ये जि.कृ.रे.केंद्र नंदुरबार येथील दोन प्रतिनिधी गाडीसोबत राहतील, अशा प्रकारचा परवाना असणे आवश्यक आहे.

१९. द्रवनत्र वाहतुकीचे वेळी वाहतुक मार्गात उपकेंद्राचे ठिकाणी वा द्रवनत्र भरुन घेण्याचे ठिकाणी घाई न करणारे व सभ्य वागणूकीचेच वाहन चालक व इतर मदतनीस असतील याची खबरदारी वाहन ठेकेदाराना घ्यावी लागेल.

२०. **यशस्वी निविदा धारकास निवीदा मंजूर झाल्यापासून सात दिवसाचें आत वाहतुकीच्या कार्यकृतिची हमी पूर्ण करणेबाबत करारनामा नियमानुसार ५००/- रुपयाच्या स्टँप पेपरवर लिहून द्यावा लागेल त्या शिवाय वाहतुक ठेका मंजूर केला जाणार नाही.**

२१. ठेकेदाराने ठेका स्विकारुन काम सुरु झाल्यावर नियमाप्रमाणे काम पार पाडण्याचे नाकारले तर त्याची भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच नविन ठेका मंजूर करताना जास्त दर मंजूर करावा लागला तर पूर्ण ठेक्याच्या रक्कमेतील फरक मूळ ठेकेदाराच्या सुरक्षा ठेवीतून व स्थावर जंगम मालमत्तेतून वसूल करण्यात येईल.

२२. मंजुर निवीदाधारक व्यतिरीक्त इतरांची अनामत रक्कम एक महिनेचे आत परत करण्यात येईल.

२३. भारत सरकार आयकर विभाग यांच्यानियमाप्रमाणे भावबंध कराराप्रमाणे प्राप्त होणा-या रकमेवर नियमाप्रमाणे लागू असलेला अधिभारासह आयकर ठेकेदारास देय असलेल्या रकमेतून परस्पर कापून या कार्यालयातर्फे सरकार जमा करण्यात येईल याशिवाय शासनाने वेळोवेळी निर्गमित होणा-या सूचनेप्रमाणे आपणांस लागू असलेल्या कराच्या रकमेची कपात देयकातून वसूल केली जाईल.

२४. **नियमानुसार देय पथकर (टोल) ठेकेदारास द्यावा लागेल.**



सत्यमेव जयते

२५. वाहतूकीचे वेळी वाहनाचे कि.मी. रिडींग सुरु असणे आवश्यक आहे. वाहतुकीची देयके ३० दिवसातून एकदाच स्विकारली जातील. वाहतुक ठेकेदाराने वाहतुकीची देयके वेळीच सादर करावीत. सदर देयके जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार,जिल्हा नंदुरबार कार्यालयातर्फे अदा केली जातील. तथापि काही प्रशासकिय कारणामूळे विलंब झाल्यास वाहतूक बंद करता येणार नाही.

२६. वाहतुक करीत असताना अचानक गाडीस बिघाड झाल्यास गाडीची दुरुस्ती ठेकेदारास स्वखर्चाने त्वरीत करावी लागेल . प्रवासात सदर वाहन वेळेत दुरुस्ती न झाल्यास व दुसरे वाहनाची आवश्यकता वाटल्यास दुसरे वाहन भाडयाने घ्यावे लागले तर त्याचे पुर्ण भाडे ठेकेदारास द्यावे लागेल.

२७. **निविदेत ठरलेले वाहन ठरलेल्या वेळेवर कामाकरिता व ठरवलेल्या वाहतुकीसाठी वाहातुकदारास काही कारणामूळे उपलब्ध करुन देता आले नाही तर अपरिहार्य परिस्थितीत दुसरे वाहन या कार्यालयासाठी उपलब्ध करुन द्यावे लागेल.(पर्यायी व्यवस्था म्हणून) त्याकरीता जास्त आकार पडला तर तो स्वतः ठेकेदारास भरावा लागेल. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे वाहन उपलब्ध न झाल्यास कार्यालय बाजारातील दुसरे वाहन उपलब्ध दराने मिळवेल व त्यासाठी द्यावे लागणारे जास्तीचे भाडे ठेकेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.**

२८. वाहतूक करीत असताना ठेकेदार अथवा प्रतिनिधीकडून कोणत्याही प्रकारचा वाहन परिवहन विषयक किंवा पोलीस कायदा विषयक नियमाचे उल्लंघन झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील व वाहन जप्त व इतर कार्यवाहीसाठी खोळंबून ठेवल्यास द्रवनत्र पात्रांच्या वाहतुकीसाठी दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करुन देवून त्यामधून द्रवनत्रपात्राची वाहतुक जबाबदारीने करुन द्यावी लागेल.

२९. एकाच वेळी एकापेक्षा जास्त वाहने शासकीय कामासाठी आवश्यक असल्यास अन्य सुस्थितीतील परिवहन नियम योग्य वाहने उपलब्ध करुन द्यावी लागतील ही वाहने अशावेळी मुख्य ठेकेदाराव्यतिरिक्त दुस-याचे असू शकतील. मात्र वाहतुकीची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराचीच राहील व वहातुकीचे दर भावबंधीत करारात निश्चित केल्याप्रमाणेच प्रति कि.मी.या दराने दयावे लागतील.

३०. संबंधित वाहनात इंधन,ऑईल,ग्रीस इत्यादि वाहतुक ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल व काही कारणाने इंधनाचा भाव वाढल्यास संबंधीत कार्यालय भाववाढ देणार नाही.

३१. वाहतुक करीत असताना शासकिय कामास्तव केंद्रावर किंवा कार्यालयात मुक्कामाच्या कालावधीकरिता कोणताही वेगळा आकार देण्यात येणार नाही. शासकिय प्रतिनिधीला कामाचे स्वरुपानुसार त्या कार्यालयात/ केंद्रावर थांबता येईल व तोपर्यत वाहन तेथे ठेवावे लागेल.

३२. या कार्यालयाकरीता नेमलेले वाहनच वाहतुकीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागेल व काही कारणाने ठेकेदाराने अन्य वाहन उपलब्ध करुन दिले तरी भावबंद करारानुसार असलेलाच प्रति कि.मी. दर मिळेल.

३३. वाहतुक करीत असताना संबंधित वाहनात ठेकेदाराच्या अधिकृत दोन प्रतिनिधीशिवाय इतर कोणतेही प्रवासी/सामान घेवू नये तसे आढळल्यास कमीत कमी **रु. ५००/-** व जास्तीत जास्त **रु.२०००/** दंड

आकारण्यात येईल.

३४. गाडीचा वेग दर ताशी **४० किं.मी** पेक्षा जास्त ठेवता येणार नाही. तसेच मद्यपान इत्यादि करुन चालक आढळल्यास व गाडीच्या वेग मर्यादेचे उल्लंघन आढळल्यास त्यास **रु. ५००/- ते रु. २०००/-** पर्यंत दंड आकारण्यात येईल व मद्यपानाबाबत कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जावे लागेल.त्यामूळे शासकीय संपत्तीचे नुकसान झाल्यास ते ठेकेदाराने भरुन द्यावे लागेल.

३५. हेच वाहन पशुसंवर्धन खात्याच्या इतर संस्थांच्या योजनांतर्गत व वाहतुकीकरिता लागल्यास उपलब्ध करुन द्यावे लागेल.

३६. वाहनामध्ये वाहतूकीच्यावेळी आवश्यक्ता असल्यास खात्याचे अतिरिक्त प्रतिनिधी वाहनासोबत जावू शकतील.

३७. जिल्हांतर्गत द्रवनत्र वाहतूक करताना जिल्हयातील प्रत्येक केंद्रावर पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार, यांचे आदेशानुसार ठरवून दिलेल्या मार्गानेच वाहतुक करण्याचे बंधन ठेकेदारावर राहील.

३८. या संबंधित उद्‌भवणा-या तक्रारीचे निराकरण करण्याचे अंतिम अधिकार जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांना राहतील.

३९. संबंधित वाहनासोबत वाहनाची कागदपत्रे ठेवणे बंधनकारक राहील.

४०. तसेच वाहनावर **महाराष्ट्र शासनाच्या सेवेत** असा फलक केवळ या कार्यालयाचे कामकाज करतांनाच लावावा.

४१. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार जिल्हा नंदुरबार यांना ठेकेदाराचे काम समाधानकारक न आढळल्यास ते बंद करण्याचे व तत्सम दुसरी कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील. अशावेळी सुरक्षित ठेव अनामत रक्कम जप्त करुन ठेकेदारावर कार्यवाही करण्यात येईल.

४२. पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांनी वेळोवेळी केलेल्या सुचना व अटींमध्ये वेळोवेळी केलेला बदल ठेकेदारास मान्य करावा लागेल.

४३. द्रवनत्र वाहतुकीच्या निविदा कालावधीत जर खात्याने वाहतुकीची पर्यायी व्यवस्था केली तर वाहतुक करार केंव्हाही रद्द केला जाईल.

४४. निविदेमध्ये कोणतीही अट किंवा पर्याय निविदा धारकास देता येणार नाही.उपकंत्राटक देता येणार नाही. तसेच एकापेक्षा अधिक दर नमुद करता येणार नाही.असे झाल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

४५. निविदा प्रक्रियेत तीन पेक्षा कमी ग्राहय निविदाप्राप्त झाल्यास अथवा अल्प प्रतीसादामुळे निविदेस पुन्हा मुदत वाढ देण्यात येईल (फेर निविदा सुचनेद्वारे)

४६. संपूर्ण निविदा स्विकारणे, मंजूर करणे, रद्द करणे व इतर कोणतेही कारण न दाखविता मान्य न करणे वगैरे सर्व बाबतीत अधिकार निवीदा समितीकडे राहतील व समितीचा निर्णय ठेकेदारास बंधनकारक

राहील. सदर निविदांबाबत कोणताही वाद उद्भवल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण (कोर्ट मॅटर) झाल्यास नंदुरबार येथील न्यायालयातच अपील करणे बंधनकारक राहील.

**जिल्हा उपआयुक्त**
**पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**
**नंदुरबार**

**वरील सर्व १ ते ४६ अटी व शर्ती मी वाचल्या असून, त्या सर्व मला मान्य व बंधनकारक आहेत.**

**वाहतुक कंत्राटदाराची सहीः-**

**संपूर्ण नावः-**

**पुर्ण पत्ताः-**

**संपर्क क्रमांकः-**

## द्रवनत्र वाहतूकसाठी केंद्रनिहाय ४ रुटचा तक्ता

| अ.क्र | मार्ग | कि मी, |
| --- | --- | --- |
| १ | शहादा मार्ग | २५० |
| २ | नंदुरबार मार्ग | १६० |
| ३ | धडगाव मार्ग | २६१ |
| ४ | नवापुर मार्ग | २१० |

## परिशिष्ट-अ
## निविदाकाराने सादर करावयाच्या बाबींची यादी.

| अ.क्र. | तपशील | शेरा | पृष्ठ क्रमांक. |
|---|---|---|---|
| 1 | निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे पीडीएफ फॉरमॅट मध्ये निविदा धारकाचे लेटर हेडवर विहित नमुन्यातील संमतीपत्र | | |
| 2 | निवीदेच्या अंतीम तारखेपर्यत ग्राहय असलेले आयकर भरल्या संबधीचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र. | | |
| 3 | वाहनाचा विमा भरला असल्याची कागदपत्रांच्या सांक्षाकिंत प्रती. | | |
| 4 | वाहनकर पुस्तिका,पंजीकृत नोंदणी पुस्तिका (रजिस्ट्रेशन बुक )यांच्या सांक्षाकिंत प्रती,मालवाहतुक परवाना | | |
| 5 | पी.यु.सी प्रमाणपत्र.नॉन कनविक्शन दाखला | | |
| 6 | पॅनकार्ड प्रत व स्वतः च्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत अकाउंट नंबर,बँक , कोड व आयएफसी कोड सह. | | |
| 7 | बयाणा रक्कम म्हणून रु. ५०००/- ( अक्षरी रु. पाच हजार मात्र ) व निविदा फॉर्म फी रु.७५०/-(अक्षरी रुपये सातशे पन्नास मात्र) मात्र चा धनाकर्ष (डी.डी.) /बँकर चेक जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांचे नावाचा 'युनियन बँक ऑफ इंडिया, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार ' शाखेचा जमा करण्यात यावा. | | |

वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रे मी तपासुन जोडलेली आहेत व ती बरोबर आहेत.

**दिनांक:-**

**ठिकाण:-**

**निवीदा धारकाची सही व संपूर्ण नाव-**

# निविदा धारकाचे संमतीपत्र

**विषय-** नंदुरबार येथून व महाराष्ट्रातुन कुठल्याही ठिकाणाहुन **दि.०१/१२/२०२५ ते दि. ३०/११/२०२६** या कालावधी करीता द्रवनत्रपात्रांमध्ये द्रवनत्र भरुन आणुन नंदुरबार जिल्हयातील १०६ पशुवैदयकिय संस्थांना पुरवठया करीता तसेच गरजेनुसार पशुसंवर्धन खात्यासाठी आवश्यक असलंल्या इतर वस्तूंचा (उदाः लसी,औषधे व इतर साहित्य इ.) वाहतुकीच्या कामाची निविदा (द्रवनत्र पात्र व रेतमात्रा वाहतुकीच्या कामाची निविदा).

**संदर्भ-** टेंडर नोटीस क्र. जिपउआ/तांत्रिक/वाहतुकनिविदा/ /२०२५ नंदुरबार दि. / /२०२५

१. निविदेतील संपुर्ण काम निविदेच्या अटी व शर्तीनुसार विहित मुदतीत पुर्ण करण्यास माझी तयारी आहे.
२. निविदेतील नमुद अटी व शर्ती मला मान्य असुन त्या माझ्यावर बंधकारक आहेत.
३. निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचुन समजुन घेतल्या आहेत.
४. निविदेत नमुद केलेले दर सर्व करासहीत आहेत.
५. निविदा- फॉर्मचे शुल्क रु.७५०/- (अक्षरी रुपये सातशेपन्नास मात्र ) व निविदा भरताना बयाणा रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) हे भरण्यास मी तयार आहे.
७. माझी निविदा स्विकृत झाल्यास रक्कम रु.२००००/- (अक्षरी रुपये वीस हजार मात्र) जमानत ठेव म्हणुन जिल्हा पशुसवंर्धन उपायुक्त, नंदुरबार यांच्या नावाने धनाकर्ष/धनादेश (डिपॉझीट) स्वरुपात तात्काळ भरण्यास मी तयार आहे
६. निविदेतील नमुद काम अटी व शर्तीनुसार न चुकता करण्याची मी हमी देत आहे.कामात काही अडचण विलंब, नुकसान झाल्यास जबाबदारी माझी राहील. त्याबाबत वसुली माझे बयाणा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम मधुन करण्यास माझी काहीही हरकत नाही.

**निविदाधारकाची सही:-**

**निविदाधारकाचा संपुर्ण पत्ता मोबाईल नंबरसहः-**

**द्रवनत्र वाहतूक आणि पशुसंवर्धन विभागासाठी आवश्यक त्या बाबींसाठी करावयाची वाहतूककरिता निविदा**

**जिल्हा पशुसवंर्धन उपआयुक्त कार्यालय, नंदुरबार**

**सन २०२५ - २६**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | निविदा सादर करण्याची अंतिम मुदत | : | दि. **२५/११/२०२५** रोजी दुपारी **०६-००** वाजेपर्यत |
| २) | निविदा उघडण्याची तारीख, वेळ | : | दि. **२८/११/२०२५** रोजी सकाळी **११.००** वाजता. |
| ३) | निविदा उघडण्याचे स्थळ | : | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांचे कार्यालय, टोकरतलाव रोड, रुम नं-७, प्रशासकिय इमारत, नंदूरबार-४२५४१२४ |
| ४) | निविदा कार्यान्वीत कालावधी | : | **०१/१२/२०२५ ते ३०/११/२०२६** |

५) निविदा उघडण्याचे वेळी निविदाकार अथवा त्याचे एक अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील

| अ.क्र. | कामाचा तपशिल | उपकेंद्रांची संख्या | वाहन पुरविण्याचा दिवस |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र नंदुरबार येथील रिकामी द्रवनत्रपात्रे नंदुरबार येथून,महाराष्ट्रातून अथवा इतर राज्यातून द्रवनत्र भरुन आणून नंदुरबार जिल्हयातील उपकेंद्रांना वाटप करणे वा पशुसंवर्धन खात्यातील इतर कामांसाठी वाहन लागल्यास उपलब्ध करुन देणे. | नंदुरबार जिल्हयात १०६ कृत्रिम रेतन उपकेंद्रे | प्रत्येक महिन्याचे ठराविक तारखेस कार्यक्रम दिला जाईल त्याप्रमाणे वाहन उपलब्ध करुन दयावे लागेल. द्रवनत्र वाहतुक व्यतिरिक्त काही काम असल्यास तसे शक्य तेवढे आगाऊ कळविले जाईल. |

**टिप** :१) निविदा भरतांना दोन पाकीट पध्दत अवलंबून

**(अ)** पहिल्या पाकीटात जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांचे नावाचा युनियन बँक जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार शाखेचा **रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र)** चा डिमांड ड्राप-ट / बँकर चेक, (रोख रक्कम अगर धनादेश स्विकारले जाणार नाहीत.) गाडीची कागद पत्रे (जसे नोंदणी पत्र पुस्तक, टॅक्स बुक, नुतनीकरण केलला परवाना ) पॅनकार्ड, आधारकार्ड, बॅकपासबुक, वाहनाचा विमा, मालवाहतुकीचा परवाना, रहिवासी दाखला, वाहन चालकाचे ड्रायव्हींग लायसन्स या सर्वांच्या साक्षांकित छायांकित प्रती असाव्यात. त्याचबरोबर या निविदेतील ' नियम व अटीपत्राच्या ' एका प्रतीमध्ये ' सदर अटी क्रमांक १ ते ४६ मला मान्य आहेत, असा लिहीलेल्या मजकूराखाली स्वाक्षरी करुन नाव आणि पत्ता नमुद करुन याच पाकीटात घालावे, व पाकीट बंद करावे व त्यावर ' **तांत्रिक लिफाफा** ' असे ठळकपणे लिहावे.

**(ब)** दुस-या पाकीटात अधिकृत निविदेच्या या प्रपत्रात वाहतूकीचा दर अंकी व अक्षरी स्पष्ट लिहून स्वाक्षरी करावी. व पाकीट स्वतंत्रपणे मोहरबंद करुन त्यावर **व्यापारिक लिफाफा** असे ठळक पणे नमूद करुन ही दोन्ही पाकीटे तीस-या पाकीटात घालून ते ही मोहर बंद करुन सदर मुख्य पाकीटावर ठळकपणे **द्रवनत्र वाहतूक निविदा** असे नमुद करुन पाकीटाच्या डाव्या कोप-यात पाठविणा-याचा नाव व पत्ता नमुद करावा.

२) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार टोकरतलाव रोड, रुम नं-७, प्रशासकिय इमारत, नंदुरबार यांच्या कार्यालयात **दिनांक २५/११/२०२५** पर्यंत दुपारी **०६-००** वाजेपावेतो निविदा पेटीत टाकावे. त्या नंतर निविदा पेटी सीलबंद करण्यात येईल व त्यानंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही. स्विकारलेल्या निविदा **दि.२८/११/२०२५** रोजी सकाळी ठिक **११-००** निविदा उघडण्यात येतील.

३) निविदाकाराने नंदुरबार येथुन रिकामी द्रवनत्रपात्रे घेऊन महाराष्ट्र किंवा इतर राज्यातुन द्रवनत्र भरुन आणणे व नंदुरबार येथुन भरलेली द्रवनत्रपात्रे घेऊन उपकेंद्रांना पुरवठा करणे व पशुसंवर्धन इतर कामांसाठी वाहन लागल्यास उपलब्ध करुन देणे यासाठीचा एकच दर खालील रकान्यात नमुद करावा.

# वाहतूक दरासंबंधी प्रपत्र

**निविदा धारकाची सही**

| अ.क्र | वाहनाचा प्रकार व आकार | दर प्रती किलोमीटर |
|---|---|---|
| १. | नंदुरबार येथुन रिकामी द्रवनत्रपात्रे महाराष्ट्रातून अथवा इतर राज्यातून द्रवनत्र भरुन आणून नंदुरबार जिल्हयातील उपकेंद्रांना वाटप करणे व पशुसंवर्धन खात्यातील इतर कामांसाठी वाहन लागल्यास उपलब्ध करुन देणे साठी (अपेक्षित क्षमता ५० ते ५५ लिटर द्रवनत्रपात्रे) | रुपये :-<br>अक्षरी रुपये:- |

**नाव:-**

**पत्ता:-**

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,नंदुरबार यांचे कार्यालय अंतर्गत.**
**जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार,**
**निविदा-सुचना**

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांचे कार्यालय अंतर्गत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार यासाठी अटी व शर्तींच्या अधीन राहून वाहनाचे कंत्राटदाराकडून द्रवनत्र वाहतूक करण्यासाठी निविदा मागवित आहेत. सदर वाहतूक अनुक्रमे जिल्हा अंतर्गत व जिल्हयाबाहेर देखील करावी लागेल. या कार्यालयात निविदा कोरे फॉर्म रु. ७५०/- शुल्क भरुन, मिळण्याचा कालावधी दि. **१३/११/२०२५** रोजी सकाळी **१०.००** वाजेपासुन दि. **२०/११/२०२५** रोजी संध्याकाळी **०६.००** वाजेपर्यंत राहील आणि निविदा भरणेचा अंतिम दिनांक **दि. २५/११/२०२५** रोजी वेळ दुपारी **०६-००** वाजेपर्यत आहे. तसेच निविदा उघडणेचा अंतिम दिनांक व वेळ- **दि. २८/११/२०२५** रोजी सकाळी **११.००** वाजता आहे.

याबाबत अधिक माहिती जिल्हयाच्या **http://nandurbar.nic.in** तसेच **http://ahd.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निवीदा स्विकृत करणे, नामंजूर करणे अथवा रद्द करणेबाबतचे अधिकार खालील स्वाक्षरी करणार यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

दिनांकः- १०/११/२०२५
स्थळः नंदुरबार

(स्वाक्षरीत)
(डॉ.तु.गो.गिते)
जिल्हा उपआयुक्त
(पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)
नंदुरबार.

## जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय,नंदुरबार यांचे कार्यालय अंतर्गत. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार,

## निविदा-सुचना

जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार पासून नंदुरबार जिल्हयातील पशुवैद्यकीय दवाखान्यांना रेतमात्रा व द्रवनत्राची (५० ते ५५ लिटर क्षमतेची अंदाजे ६० किलो वजनाची ३५ द्रवनत्रपात्रे) वाहतूक करणेसाठी वाहतूकदाराकडे दहा वर्षाच्या आतील नोंदणी असलेले टेम्पो वाहन असणे आवश्यक आहे. जिल्हयातील १०४ संस्थांना द्रवनत्र व रेतमात्रा पुरविण्यासाठी दरमहा ४ रुटद्वारे सर्वसाधारणपणे एकूण ९०० कि.मी.याप्रमाणे वर्षात अंदाजे ११००० कि.मी. वाहतूक करावी लागते. या व्यतिरिक्त द्रवनत्र खरेदीच्या होणा-या भावबंध करारानुसार द्रवनत्र आणणेसाठी नाशिक अथवा महाराष्ट्रातील इतर ठिकाणी दरमहा साधारणतः दोन ते तीन वेळा जावे लागू शकते. तसेच पशुसंवर्धन खात्याशी संबंधित इतर साहित्य आणणेसाठी आवश्यकता असल्यास जिल्हा अंतर्गत व जिल्हयाबाहेर देखील जावे लागेल. सदर वाहतूक अनुक्रमे जिल्हा अंतर्गत व जिल्हयाबाहेर देखील करावी लागेल.

**यासाठी खालील नमूद सर्व अटी व शर्तीच्या अधीन राहून वाहनाचे कंत्राटदाराकडून निविदा मागवित आहेत.**

१) निविदेमध्ये वाहतूकीचा दर एका किलोमिटर करीता देणेचा आहे.

२) निविदा कालावधी – **दि. ०१/१२/२०२५ ते ३०/११/२०२६** किंवा पुढील निविदा सन **२०२६-२७** ची मंजुर होईपर्यंत राहील.

३) निविदेच्या अटी व शर्ती तसेच निविदे संबंधी इतर कोणतीही माहिती जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

४) निविदा कोरे फॉर्म मिळण्याचा कालावधी **दि.१३/११/२०२५** रोजी **१०.००** वाजेपासुन ते **दि.२०/११/२०२५** रोजी संध्याकाळी **६-००** वाजेपर्यंत राहील. (शासकिय सुटीचे दिवस वगळून)

५) निविदा फॉर्मचे शुल्क रु.७५०/- (अक्षरी रुपये सातशे पन्नास मात्र ) व निविदा भरताना बयाणा रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) चा धनाकर्ष (डी.डी.)/बँकर चेक जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांचे नावाचा युनियन बँक ऑफ इंडिया, जिल्हाधिकारी कार्यालय,नंदुरबार शाखेचा जमा करण्यात यावा.

६) निविदाधारकाची निविदा मंजुर झाल्यास, परंतु अन्य कारणांनी त्यांची निविदा नाकारल्यास त्याची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७) निविदा भरणेचा अंतिम दिनांक,वेळ-**दि.२५/११/२०२५ रोजी दुपारी ०६.०० वाजेपर्यत**

८) निविदा उघडणेचा अंतिम दिनांक, वेळ-**दि.२८/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता.**

निविदाधारकांना कार्यवाहीमध्ये अडीअडचणी आल्यास तसेच निविदाच्या अटी व शर्तीबाबत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांना ०२५६४-२१००१६ याक्रमांकावर दूरध्वनी करावा.कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणेचा अगर नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

याबाबत अधिक माहितीजिल्हयाच्या**http://nandurbar.nic.in**तसेच **http://ahd.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निवीदा स्विकृत करणे, नामंजूर करणे अथवा रद्द करणेबाबतचे अधिकार खालील स्वाक्षरी करणार यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

दिनांक:- १०/११/२०२५
स्थळ: नंदुरबार

**(स्वाक्षरीत)**
**(डॉ.तु.गो.गिते)**
**जिल्हा उपआयुक्त, (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)**
**नंदुरबार.**